# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २१/०३/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

### चोरी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत ०१ कि.मी. अंतरावरील मदनकर लेआउट मौदा येथे दिनांक फिर्यादी नामे— सौ. पुष्पा रमेश उपाध्याय, वय ५० वर्ष, रा. गुरुदेव ता. मौदा हे गुरुदेव चौक मौदा येथे पुजारी म्हणून दोन वर्षा पासून काम करतात. दि. २०/०३/२०२२ रोजी सकाळी ०९.०० वा. फिर्यादी मंदीरात आले असता मंदीराचे समोरील गेटचा लॉक उघडून मंदीराचा आत जावून पाहीले असता मंदीरातील दान पेटीचे लॉक तुटलेले होते व दान पेटी मध्ये असलेले अंदाजे १०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले. अज्ञात आरोपीने दिनांक १९/०२/२०२२ चे ०६.०० वा. ते दिनांक २०/०३/२०२२ चे ०९.०० वा. दरम्यान मंदीरातील दान पेटीचे लॉक तोडुन दान पेटी मध्ये असलेले अंदाजे १०,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मेश्राम मो.क्र. ९८२२५४५१६९ हे करीत आहे.

### विनयभंग

**पो.स्टे. सावनेर** :— दिनांक २०/०३/२०२२ चे १७.३० वा. दरम्यान वय २८ वर्ष फिर्यादी/पीडित ही आपल्या घरात कपडे धुत असतांना आरोपी नामे— आकाश उर्फ लेखराज चक्रधर आवते, वय २४ वर्ष, रा. यशवंतबाबा झोपडपट्टी सावनेर सावनेर याने तिच्या घराचा दरवाजा ठोठावला असता तिने दरवाजा उघडला. यानंतर आरोपीने घरात आत जावुन पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. आरोपीने फिर्यादीला हातबुक्याने मारहाण केली व ‘तु माझी बदनामी केली तर तुला मी सोडनार नाही’ अशी धमकी देवुन शिवीगाळ केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (अ), ३२६, ४५२, ५०४, ५०६ भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि रासकर मो.नं. ७३५००५५६६९ या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर